21-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 20-04-2025 21:55 Page 1

जनसंपर्काच्या माध्यमातून लोकशाही मजबूत होणार

मंत्री श्रीपाद नाईक पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियातर्फे राष्ट्रीय जनसंपर्क दिवस

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी,दि. २० : लोकशाही मजबूत करण्यासाठी जनसंपर्काचा मोठा वाटा आहे.सामान्यातला सामान्य माणूस कसे जीवन जगतो हे वातानुकूलित बंगल्यात, ऑफिसमध्ये बसून समजणार नाही त्यासाठी जनसंपर्क हवा. जनसंपर्काच्या माध्यमातून लोकशाही आणि देश मजबूत होईल, असे मत केंद्रीय राज्य मंत्री श्रीपाद नाईक यांनी मिरामार येथे व्यक्त केले.

पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या गोवा चॅप्टरने गोवा मराठी पत्रकार संघाच्या सहयोगाने मिरामार रेसिडेन्सी सभागृहात रविवारी राष्ट्रीय जनसंपर्क दिवस साजरा केला त्यावेळी मंत्री श्रीपाद नाईक प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विशेष निमंत्रित सकाळ वृत्तपत्राचे समूह संपादक डॉ. नीलेश खरे, पब्लिक रिलेशन्स कौन्सिल गोवा चॅप्टरचे अध्यक्ष दीपक नार्वेकर, सचिव निखिल वाघ, उपाध्यक्ष गुरुनाथ पै,उपाध्यक्ष तथा गोवा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष वामन प्रभू उपस्थित होते.

डॉ. निलेश खरे म्हणाले, गेल्या दहा वर्षात जनसंपर्क पद्धतीत आमूलाग्र बदल झाला आहे. सरकार, संस्था या पुरता जनसंपर्क मर्यादित राहिला नसून तो व्यक्तिगत पातळीवर पोचला आहे. जनसंपर्क राजकीय पक्षांकडून शिकावा असे चित्र निर्माण झाले असून, नरेंद्र मोदी यांनी जनसंपर्क काय असतो हे दाखवून दिले आहे. जनसंपर्काच्या दृष्टीने आपली पिढी श्रीमंत असल्याचे नमूद करून डॉ. खरे यांनी सांगितले की, पुढच्या पिढीला सांगण्यासाठी पुष्कळ गोष्टी आम्हा पत्रकार पिढी जवळ आहेत. नकारात्मक शोधण्यापेक्षा राजकारण्यात सकारात्मक आहे ते शोधण्याचा प्रयत्न करूया. लोकांच्या सेवेसाठी उत्तम बातमी पोहचवू शकलो तर ती चांगली गोष्ट आहे.

दीपक नार्वेकर यांनी प्रास्ताविकात गोव्यात पूर्ण दर्जाचे पत्रकारिता महाविद्यालय होण्याची गरज प्रतिपादिली. निखिल वाघ यांनी स्वागत केले. दिनेश तारे यांनी सूत्रसंचालन केले. वामन प्रभू यांनी आभार मानले.

सोळा पत्रकारांचा सत्कार

या सोहळ्यात १६ पत्रकारांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यात बबन भगत (नवप्रभा), रामनाथ पै रायकर (नवहिंद टाईम्स), किशोर कुबल (लोकमत), अजित पीटर जॉन (हेराल्ड), संदीप रेडकर (तरुण भारत), संदीप केरकर (प्राईम टीव्ही), विठ्ठल पारवाडकर (दैनिक पुढारी), सचिन कोरडे (दैनिक गोमंतक), यती लाड फातर्पेकर (इन गोवा), विभा वर्मा (द गोवन), लौकिक शिलकर (प्रुडंट), विश्वनाथ नेने (गोमंतक टीव्ही), सचिन खुटवळकर (गोवन वार्ता), अमर पाटील (भांगरभूय), चैतन्य सावंत (दैनिक हेराल्ड) व रमेश नाईक राऊत (गोवा ३६५) यांचा समावेश होता.

पान १ वरून

आंबेडे हादरले ! वडिलांनीच रचला मुलाच्या हत्येचा कट !

आखण्यासाठी देविदासने हत्येच्या दोन दिवस आधी १३ एप्रिल रोजी त्याच्याशी संपर्क साधला होता. श्रवणवर हिंसक वर्तनाचा आरोप करत देविदासने यापूर्वी अनेक पोलिस तक्रारी दाखल केल्या होत्या. अशाच एका घटनेत, श्रवणला वाळपई पोलिस ठाण्यात बोलावून ताकीद देण्यात आली होती.

शवविच्छेदन अहवालात श्रवणचा गळा दाबून मृत्यू झाल्याचे उघड झाले. तथापि, पोलिसांना श्रवणच्या गळ्यात दोरी सापडली, ज्याचा वापर तपासाची दिशाभूल करण्यासाठी करण्यात आला असे फॉरेन्सिक तज्ज्ञांचे मत आहे.

हत्येचा निश्चित हेतू तपासाधीन असताना, पोलिस अधीक्षक कौशल यांनी सांगितले की, बर्वे कुटुंबाचे श्रवणशी असलेले नाते खूप ताणले गेले होते. पाच वर्षांहून अधिक काळ, श्रवण आंबेडे येथे एकटाच राहत होता, तर त्याचे बाकीचे कुटुंब होंडा येथे राहत होते. फक्त त्याचे वडील देविदास हे अधूनमधून अन्न पोहोचवण्यासाठी संपर्कात राहत होते.मनोरंजक गोष्ट म्हणजे, ज्या मंदिराजवळ वाढदिवसाची पार्टी झाली ते बर्वे कुटुंबाने बांधले होते आणि वासुदेव ओझेकर यांना त्यांनी मंदिर समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केले होते. पार्टी स्थळ आणि गुन्हेगारीचे ठिकाण (एक मैलापेक्षा कमी अंतरावर) यांच्याजवळ असल्याने त्या रात्रीच्या घटनांचा हत्येशी संबंध आहे. पोलिस अधीक्षक कौशल यांनी पुष्टी केली की वासुदेव बर्वे कुटुंबाच्या फार्मवर काम करत होता, जिथे श्रवणचा मृतदेह सापडला होता. तपास पुढे जात असताना आणखी अटक होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

मडगावातील दुकानाला आग

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २० : मडगावातील गांधी मार्केट येथील शुभ लाभ मेटल मार्ट या दुकानाला आग लागण्याची घटना शनिवारी रात्री घडली. मडगाव अग्निशामक दलाकडून आगीवर नियंत्रण आणण्यात आले. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मडगावातील गांधी मार्केट परिसरातील शुभ लाभ मेटल मार्ट या दुकानाला रात्री आग लागली. दुकान बंद करण्यात आल्यानंतर त्यातून धूर येऊ लागल्याने उपस्थितांना दिसले. त्यांनी तातडीने याप्रकाराची माहिती दुकान मालकाला दिली तसेच मडगाव अग्निशामक दलालाही सांगण्यात आले. दुकान मालकाने दुकान उघडले असता आत आग लागल्याचे दिसून आले.

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **546/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-62-2024-ACNZ/2024 in which Shri Antonio Salvador Fernandes resident of Miramar, Panjim, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 20 survey No. 390/1 situated at Socorro village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 340 square-meters without the formalities of auction for being Jonoeiro of Communidade of Serula.

Boundaries:
East:- By Plot No 'D'; West:- By 6 mtrs road; North:- By Plot No 21; South:- By Plot No 19

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **549/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-38-2024-ACNZ/2024 in which Shri Eustaquio Cedric Fernandes resident of Porvorim, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. B (Phase IV) survey No. 179/1 situated at Penha-de-franca village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 326.28 square-meters without the formalities of auction for being Jonoeiro of Communidade of Serula.

Boundaries: East:- By Plot No C of Phase IV of survey no 179/1; West:- By existing 10 mtrs road of Phase IV of survey no 179/1; North:- By existing 10 mtrs road of Phase IV of survey no 179/1; South:- By Plot No A of Phase IV of survey no 179/1

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **550/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-26-2024-ACNZ/2024 in which Shri Edsel Trindade resident of Dona-Paula, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 30 survey No. 390/1 situated at Socorro village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 300 square-meters without the formalities of auction for being Jonoeiro of Communidade of Serula.

Boundaries:
East:- By Plot No 29-A; West:- By 6 mtrs wide road; North:- By Plot No 31; South:- By 10 mtrs wide road

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **542/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-15-2024-ACNZ/2024 in which Smt. Janet Audrey Barcellos resident of Socorro, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 8 survey No.400/1 situated at Socorro village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 300 square-meters with the formalities of auction.

Boundaries:
East:- By Plot No 55 in Survey No 400/1 Socorro; West:- By Plot No 9 in Survey No 400/1 Socorro; North:- By Plot No 7 in Survey No 400/1 Socorro; South:- By 8 mtrs existing road in Survey No 400/1 Socorro

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **545/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-59-2024-ACNZ/2024 in which Shri Nitin Bhanudas Shet resident of Pirna, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 'B' survey No 109 situated at Salvado Do Mundo village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 350 square-meters without the formalities of auction for being Jonoeiro of Communidade of Serula.

Boundaries: East:- By Plot No 'C' of same sub-division; West:- By 10 mtrs road of same sub-division; North:- By By 10 mtrs road of same sub-division; South:- By Plot No 'A' of same sub-division

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **543/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-24-2024-ACNZ/2024 in which Shri Nitin Vishnudas Halankar resident of Cumbharjua, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 24 survey No. 22/1 (part 1) situated at Socorro village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 300 square-meters with the formalities of auction.

Boundaries:
East:- By Plot No 35; West:- By 6 mtrs road; North:- By Plot No 23; South:- By Plot No 25

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **541/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-17-2024-ACNZ/2024 in which Smt. Pramodhi Nanda Naik resident of Socorro, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 17 survey No.389/1 situated at Socorro village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 330 square-meters with the formalities of auction.

Boundaries:
East:- By open space of same sub-division; West:- By 6 mtrs wide road; North:- By open space of same sub-division; South:- By Plot No 16

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **553/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-60-2024-ACNZ/2024 in which Shri Rajendra Prabhakar Shet Shirodkar resident of Pomburpa, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 20 survey No. 8/1 situated at Socorro village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 300 square-meters without the formalities of auction for being Jonoeiro of Communidade of Serula.

Boundaries: East:- By Plot No 9 and 10 of the same sub-division; West:- By 8 mtrs wide road of the same sun-division; North:- By Plot No 21 of the same sub-division; South:- By Plot No 19 of the same sub-division

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **561/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-42-2024-ACNZ/2024 in which Shri Sachin Chandrakant Metri resident of Sangolda, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 29 survey No 362/1 situated at Socorro village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 400 square-meters with the formalities of auction.

Boundaries:
East:- By 8 mtrs road of same sub-division; West:- By private property; North:- By Plot No 30; South:- By Plot No 28

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **547/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-41-2024-ACNZ/2024 in which Shri Sanket Sanjay Mahembre resident of Assonora, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 27 survey No.6/1 situated at Socorro village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 336 square-meters without the formalities of auction for being Jonoeiro of Communidade of Serula.

Boundaries:
East:- By open space; West:- By 6 ntrs wide road; North:- By open space; South:- By Plot No 30

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **544/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-44-2024-ACNZ/2024 in which Shri Sheldon De Cruz resident of Porvorim, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No. 38 survey No 389/1 situated at Socorro village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 400 square-meters with the formalities of auction.

Boundaries:
East:- By Plot 39 of same survey No ; West:- By 6 mtrs road; North:- By 6 mtrs road; South:- By Plot 20 of same survey No

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

OFFICE OF THE COMMUNIDADE OF SERULA
West Coast Residency, 1st Foor, (Opp. Bank of India) P.O. Porvorim, Bardez - Goa - 403 521
Ref. : **548/Com-Ser 2025-2026** Date: **09-04-2025**

NOTICE

The above mentioned Communidade is hereby convened to meet at its meeting place on the 11 -05-2025 at 10:00 A.M. after the publication of this Notice in the official Gazette. In order to give its opinion on the file No. 1-58-2024-ACNZ/2024 in which Smt. Suchita Sushant Mhapankar resident of Pernem, Goa has applied on lease (aforamento) for construction of residential house on uncultivated and unused plot No.'D' survey No.109/1 situated at Salvador do mundo village of Bardez Taluka and belonging to the Communidade of Serula admeasuring 320 square-meters without the formalities of auction as the applicant is a government servant.

Boundaries:
East:- By Plot No 'F' of same survey; West:- By Plot No 'A' of same survey; North:- By Plot No 'C' of same survey; South:- By 10 mtrs wide road

Date: 09-04-2025 seal **sd/-** **Saiesh S. Kubal** (Clerk of Communidade)

नाट्यकलेत आत्मविश्वास वाढण्याची क्षमता

नरेंद्र नाईक हणखणे हायस्कूलमध्ये नाट्यप्रशिक्षण कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २०: नाटक हे केवळ रंगमंचावरचे प्रदर्शन नसून ते मानवी जीवनाचे प्रतिबिंब असते. त्यात माणसाच्या भावना असतात, विचार असतो, समाजाचा आरसा असतो आणि व्यक्त होण्याची शक्ती असते. नाट्यकलेत विद्यार्थ्यांमधील संवाद कौशल्य, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढण्याची क्षमता असते, असे प्रतिपादन नरेंद्र नाईक यांनी हणखणे येथे केले. सरकारी हायस्कूल हणखणे आयोजित पाच दिवसांच्या नाट्यप्रशिक्षण कार्यशाळेच्या समारोप सोहळ्यात ते बोलत होते.

सरकारी हायस्कूल हणखणेचे मुख्याध्यापक नरेंद्र नाईक यांच्या हस्ते समई प्रज्वलित करून या नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नाट्य अभिनय प्रशिक्षक ज्ञानेश्वर पार्सेकर, विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका नीता पेडणेकर, विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख शिक्षक रामा बिचोलकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अश्विनी घाटवळ आदी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

मुख्याध्यापक नाईक म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण हे नाट्य अभिनयासारख्या क्रियाशील शिक्षण पद्धतींना पाठबळ देऊन विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य, सर्जनशीलता व आत्मविश्वास वाढवते. याच उद्देशाने या नाट्य प्रशिक्षण कार्यशाळेच्या आयोजनाचा हेतू असल्याचे आहे.

या पाच दिवसाच्या नाट्य अभिनय कार्यशाळेत शाळेच्या ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कला व संस्कृती संचालनालयाच्या वतीने नाट्य कला प्रशिक्षक म्हणून ज्ञानेश्वर पार्सेकर यांची या नाट्यप्रशिक्षण कार्यशाळेसाठी नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी नाट्यशास्त्रसंदर्भात विविध धडे देताना अभिनय, अभिव्यक्ती, संवादफेक, शरीरभाषा आणि रंगमंचीय तंत्र अशा अनेक गोष्टी विस्तृत करून सांगून विद्यार्थ्यांकडून विविध नाट्य विषयक प्रात्यक्षिक करून घेतली. जय शेट्ये या विद्यार्थ्यांने आपले मनोगत व अनुभव कथन केले. प्रशिक्षणार्थींना विविध विषय देऊन त्यावर समारोपप्रसंगी सादरीकरण करून घेण्यात आले. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रामा बिचोलकर यांनी केले.

हणखणे : ज्ञानेश्वर पार्सेकर यांचा गौरव करताना नरेंद्र नाईक व इतर.

कोरगाव : 'इथे ओशाळला मृत्यू' नाटकातील कलाकारांसोबत उद्योजक ॲड.श्याम शेट्ये, देवस्थानचे अध्यक्ष उत्तम शेट्ये.

कोरगावात 'इथे ओशाळला मृत्यू' स प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २० : कोरगाव येथील श्री सालेश्वर देवस्थानच्या श्री रघुगोनशेठच्या वार्षिक महापूजानिम्मित आयोजित नाट्यमहोत्सवात हरमल येथील दूर्वांकुर कला केंद्र निर्मित 'इथे ओशाळला मृत्यू' नाटकास रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. या नाटकात शशिकांत कोरकणकर (छत्रपती संभाजी), प्रकाश रामजी (कवी कलश), भरत वस्त (गणोजी), संजय नाईक (प्रल्हाद पंत), दत्ताराम ठाकूर (औरंगजेब), अर्जुन गडेकर (फकृदिन), विजय बर्डे (आसदखान), रामचंद्र केरकर (मल्होजी), प्रकाश कोरकणकर (संताजी), महादेव गावडे (धनाजी), भवेश गडेकर (मुर्करब खान) व सोनिया शेट्ये (येसूबाई)यांच्या प्रमुख भूमिका साकारल्या. यावेळी संजय नाईक, श्रीकांत कान्होजी, विजय कोरकणकर यांनी सहाय्यक भूमिका केल्या. प्रारंभी देवस्थानतर्फे राजमोहन शेट्ये यांनी स्वागत केले. यावेळी श्याम शेट्ये यांनी कलाकारांचे कौतुक केले व संस्थेच्या कार्याबद्दल विशेष माहिती जाणून घेतली. दरम्यान,संस्थेची खास बैठक रविवार, दि. ४ मे रोजी अशोक हरमलकर यांच्या निवासस्थानी सकाळी १० वाजता घेण्यात येईल, असे सचिव अर्जुन गडेकर यांनी सांगितले.

'विद्याप्रसारक'चे बक्षीस वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २० : विद्याप्रसारक विद्यालयात शालेय वर्ष २०२४-२५चा बक्षीस वितरण समारोह उत्साहात झाला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून मांद्रे गावचे पंचसदस्य व माजी सरपंच प्रशांत ऊर्फ बाळा नाईक उपस्थित होते. त्याचबरोबर विद्याप्रसारक व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अनंत शेटगावकर, सचिव अनिल गाड ,खजिनदार संजय दाभोलकर, सदस्य प्रकाश शेटगावकर,मोरजी गावाच्या पंच सदस्य सौ.सुरेखा शेटगावकर, माध्यमिक पालक शिक्षक संघाचे अध्यक्षा प्रीती शेटगांवकर , उपाध्यक्ष भास्कर शेटगांवकर,एस.एम.सी अध्यक्ष राजेंद्र शेटगांवकर, सदस्य विष्णू शेटगांवकर,संजना शेटगांवकर , शिवानंद दाभोलकर,अनिल दाभोलकर ,रूपेश शेटगांवकर, शाळेचे मुख्याध्यापक दिलीप मेथर, शिक्षक व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून व सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. शालेय वर्ष २०२४-२५ मध्ये शाळेतील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात विजेत्या ठरलेल्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.